


टल्लीची
शाळा

टल्लीची शाळा
कवी - टल्ली



जगभरच्या बहिणींना हे पुस्तक भाऊबीज भेट



© २००९
या  पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे भाषांतराचे, उतारे घेण्याचे
सर्व हक्क ई-साहित्य प्रकाशनाकडे आहेत

प्रकाशन

कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १९३१
१८ ऑक्टोबर २००९


प्रकाशक

ई-साहित्य प्रकाशन
esahity@gmail.com
☎: 9869674820

मुखपृष्ट
अमृता ढगे

मांडणी
आनंद माने

## प्रकाशकाचे शब्द





नमस्कार मित्रांनो

आज टल्लीची शाळा हे ई बुक प्रकाशित होतंय.

ई साहित्य प्रकाशनचं हे पहिलंच ई बुक. तसं वर्षभर ई मॅगझीन चालवल्यानंतर हे साहजिकच होतं. सुमारे पन्नास हजार मराठी वाचकांपर्यंत एकाच दिवशी जाण्याची ताकद असणारं हे ई माध्यम. तेही अत्यल्प खर्चात. आजवर साहित्याच्या प्रसारासाठी हे वापरलं न गेलं याचंच नवल आहे. असू दे. फ़ार वेळ नाही गेलेला. २००९ च्या या दिवाळीत अगदी ऐन अश्विनी अमावास्येच्या शेवटच्या घटकेला या पहिल्या ई पुस्तकाचं प्रकाशन होतंय. आणि प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणे वर्धिष्णू मराठी भाषेचा हा अश्व सात समुद्र पार जग जिंकत जाणार यात आम्हाला संशय नाही.

हे पहिलं ई बुक नाही. मराठीतलं ही नाही. पण तसं हे पहिलंच. मराठीतल्या अनेक पुस्तकांचं रुपांतर आजवर ई बुक मध्ये झालंय. पण 'टल्लीची शाळा ' आजवर पुस्तक वा छापील स्वरूपात कधीच आलेलं नाही. ते डायरेक्ट ई स्वरूपात येणारं (बहुधा) पहिलंच पुस्तक असावं. आणि असं विनामूल्य ५०००० लोकांपर्यंत पहिल्याच दिवशी जाणारं तर नक्कीच पहिलं.






ओर्कुटच्या एका थ्रेडवर टल्ली नावाच्या एका कवीने
टाकलेल्या या कविता. कथेचं एक सूत्र यांच्यात होतंही
आणि नव्हतंही. होतं , कारण त्यात एका मुलाच्या
आयुष्याचा धागा होता. नव्हतं, कारण या कथेत
काही नाविन्य नव्हतं, नाट्य नव्हतं.आपल्या आजूबाजूला
घडणाऱ्या असंख्य घटनांपैकी या साध्यासुध्या घटना आहेत.

कविता म्हटलं कारण त्यांतून भावुकतेचा एक स्त्रोत आहे. पण ती भावुकता शब्द बंबाळ नाही. थोडक्यात एखादी बातमी सांगावी तसा त्यांचा बाज आहे. त्यात गाऱ्हाणं नाही. फ़क्त मुलाला दिसलेल्या घटना. त्या घटनांचा अर्थ वाचकावर सोडलेला आहे. बातमीमागची बातमी शोधण्याचं काम वाचकावर सोपवलेलं आहे. त्या घटनेतलं चांगलं वाईट ठरवण्याचं काम वाचकावर सोपवलंय.

हे वर्णन सेल्फ़लेस नाही. पण त्यातला सेल्फ़ इतरांवर स्वतःच्या भावना लादत नाही. तरीही जर कुणी भावुक झालंच तर त्याचं श्रेय वाचकाच्या संवेदनशीलतेला जातं. रस्त्यावर एखादा माणूस एखाद्या मुलाला बदडत असताना असंख्य लोक बाजूने जातात. त्यातल्या एखाद्याला असह्य होतं. आणि त्यातलाही फ़ारच विरळा त्यात हस्तक्षेप करतो. तसंच हे. या कवितांनी जर तुम्हाला अस्वस्थ केलं तर त्याचं श्रेय तुम्हा वाचकांनाच. तुमच्या संवेदनशीलतेला.


मात्र किमान इतकं करा. कविता आवडल्याचं , पुस्तक आवडल्याचं, या पुस्तकाची संकल्पना आवडल्याचं आम्हाला कळवा. काही खटकलं तरी ते कळवा. काही नवीन कल्पना सुचल्यास त्या कळवा. मराठी साहित्याला प्रकाशनासाठी एक नवीन प्लॅटफ़ॉर्म उभा रहात आहे. आणि आपला सहभाग असल्याशिवाय तो यशस्वी होऊ शकणार नाही.



ई साहित्य प्रकाशन

# कच्चू

-----------------------------------



पहिलीत असताना
शेजारची कच्चू आवडायची

आवडायची अख्खी कच्चू
तिचा फ़्रॉक, चड्डी
तिची माळ, गाल
तिचे केस, रिबीन
तिच्या बांगड्या, हात
आणि तिचे पडके दात


चहात बुडवलेलं बिस्कीट
अर्धं तुटून चहात पडे
आणि चहा अंगावर उडे
मग ती "उई उई " करायची
तेही आवडायचं
आणि मी हसतो म्हणून
परत परत बिस्कीट पाडून
"उई उई " करणं
ते तर खूपच आवडायचं

तिला सोडून घरी यायचं ते
आईचा धपाटा खाल्ल्यावरच

आणि शेंबड्या रोहितला मी मारलेलं
तिला ढकललं म्हणून




------



कच्चू कुठे आणि कधी गेली कळलंच नाही...
खरंच गेली ?
बरंच झालं....
नाहीतर तीही मोठी झाली असती.

-----टल्ली





धडा
-----


दुसरीतल्या डोंगरे बाई
त्यांचे मोठ्ठे डोळे
आणि
पट्टी धरलेला बिन बांगड्यांचा हात

सोमवारी पंधरा ते वीस चे पाढे
पाठ करुन यायला सांगितले
पण शनीवार गेला सुजय, पप्प्या बरोबर
रवीवारी मावशीकडे टिनी मिनी
संध्याकाळी सिनेमा संपल्यावर आठवण झाली...

तसाच बसलो पाठ करायला
पण अठरा एकोणीस काही
डोक्यातच शिरेनात
एकोणीस तर आडा टेढा
घुसेचना डोक्यात
डोळ्यांना झोप आवरेना
मनाला झोप येईना

रात्रभर स्वप्नं ...पाढे आणि
डोंगरेबाईंची पट्टी
आणि बिनाबांगड्यांचा हात...
आणि एकोणीसचा पाढा

ई साहित्य प्रकाशन



रात्रीत सारखा दचकून उठत होतो
शाळेत
माझा नंबर येईतो
मी भितीने अर्धमेला
आणि बाईंनी नेमका--
-----वीसचाच पाढा विचारला.


त्या दिवशी एक नवीनच धडा शिकलो
उगाच भितीने मरायचं नाही.

------टल्ली



साहित्य प्रकाशन

आई गेली तो दिवस
-----------------------




चौथीची नुकतीच सुरुवात
बाहेर भन्नाट पाऊस
येडा येडा झालो
मधल्या सुट्टीत चिंब भिजून वर्गात आलो

कोल्हे बाई होत्या
नाही नाही ते बोलल्या
सगळ्या वर्गासमोर
आणि सगळा वर्ग
फ़िदी फ़िदी खिदळत होता
तेवढ्यात दरवाजात हेड बाई
आणि त्यांच्याआड मनुमामा
मी टरकलो
हेडबाई कोल्हेबाईंना हळूहळू काही बोलल्या
मनुमामाने चलायची खूण केली
फ़िदीफ़िदी मावळलं
आणि मी घरी निघालो
-----


का कोण जाणे
पुढे काही गृहपाठ केला नाही तरी
कोल्हेबाई मला काहीच बोलल्या नाहीत
कधीच काहीच बोलल्या नाहीत.

----- टल्ली



ताई रडली तो दिवस

-----------------------------------------------------------





आई गेली तेव्हा ताई आणि मी रडलोच नाही
दोघेही अचानक मोठे झालो
आणि पपा अचानक म्हातारे

रात्री उशीरा येऊ लागले
खरखरीत सफ़ेद दाढी
केस गळायला आणि पिकायला लागले
पाठीत पोक
आणि तोंडाला नको नकोसा वास
अडखळत बोलायचे
अडखळत चालायचे
लोक त्यांना टल्ली म्हणायचे

जवळच रहाणारी आत्या रोज घरी यायची
सकाळीच दोन वेळचं जेवण करायची
आमचा राग राग करायची
ताईला तर काहीही बोलायची

नरुकाका - आत्याचे यजमान- मात्र
खुप चांगले
खाऊ चॉकलेट आणायचे
आणि ताईला आग्रहाने खाऊ घालायचे
माझेही लाड करायचे
पण ताईचे मात्र खुप







का कोण जाणे
ताई मात्र त्यांना टाळायची
माझ्या बरोबर-बरोबर रहायची
माझ्याबरोबरच बाहेर निघायची
इतर वेळी दुकानात जायला आळस करायची
पण नरुकाका घरात असले की
आपणहून घराबाहेर रहायची.

एके दिवशी मात्र विचित्रच झालं.
घरात आत्या आणि आम्ही दोघं
अचानक काका आले आणि आत्याला काही सांगितलं
आत्या तशीच तिच्या घरी गेली
जाताना ताईला स्वयंपाक घरातलं काम सांगून गेली
मी मात्र बाहेरच खेळत, टीव्ही बघत बसलेला

अचानक ताई बाहेर आली
हमसाहमशी रडत
आणि काका तिच्यामागून
आम्ही दोघे कितीतरी वेळ तिची समजूत काढत होतो
नरुकाका तिच्या पाठीवरुन हात फ़िरवत होते
पण ती थांबेचना




ई साहित्य प्रकाशन




मग आत्या आली
काकांकडे प्रश्नार्थक बघत
काका म्हणाले, "तिला आईची आठवण येतेय"
आणि आत्या नाक मुरडून आत निघून गेली.
जळल्या भाजीवर पाणी ओतायला...

मला मात्र एक गोष्ट कधीच नाही कळली
ताई इतक्या दिवसानंतर का रडली ?

------ टल्ली



हडळ
------



पाचवीच्या वर्गामागे एक पडका वाडा
शाळा सुटताच लपंडावाची मस्त जागा

अत्रंग सुजय एकदा लपला तो सापडेच ना
मी त्याला शोधत वाड्याच्या आत आत
मागल्या अंगाला एकटाच
अंधुकशी संध्याकाळ
आणि काळवंडलेलं छत
--------मध्येच एक पिंपळ
भिंतीतून उगवलेला
आडदांड
जवळ गेलो तर गदगद हलत होता
अणि घुमत होता सगळा
ऊंह ऊंह ऊंह ऊंहः
ऊंह ऊंह ऊंह ऊंहः
मी टरकलेला
आणि अचानक पिंपळा आडून काही पांढरंसं फ़डफ़डून माझ्याकडे आलं.
माझी हातभर फ़ाटली
राम राम राम कींचाळत मी बाहेर पळत सुटलो
--------------
पाठोपाठ कुणी लुनावरून गेलं
पांढरा दुपट्टा
आणि गोरेगोरे पाउल... सरळ...

अत्रंग सुजय खॊ खॊ हसत बाहेर आला
मी मात्र वाड्यात परत पाऊल टाकलंच नाही
----टल्ली




ताई दुसऱ्यांदा रडली तेव्हा

--------------------------------


आमची कौलारू चाळ
आणि स्वयंपाक घरातच मोरी.
शेजारच्या घरातले वास फ़टींवाटे इथे यायचे.
जिभेला पाणी सुटायचं
कुणालदादाचं लग्न झालं तेव्हा तर घमघमाट.
मी त्यांच्या घरात रेंगाळायचो.


मोरीही स्वयंपाक घरातच.
ताई आंघोळ करताना दार लावायची स्वयंपाक घराचं.
पण मी मात्र तसाच करायचो.
ताईला काय लाजायचं ?
पपा तर असून नसून सारखेच...
ताई सकाळच्या शाळेला जायची म्हणुन आधी आंघोळ तिची
मग मी.



एकदा ताई घरात नव्हती म्हणून
दांडीवरचा टॉवेल काढायला
कठड्यावर चढलो
आणि चुकुन पलिकडे लक्ष गेलं
तर पलिकडे कोमल वहिनी आंघोळ करत होती
मी लगेच खाली उतरलो
ज्याम थर्थरत होतो
सगळं अंग कांपत होतं
आणि कानशिलं गर्म गरम
वीज गेल्यासारखं झालं
मानेखालून सर्रकन
नको म्हटलं तरी डोळ्यांसमोर तेच दृश्य.
तेच ते दृश्य...


शाळेत सुद्धा तेच दृश्य.
सुजयने बरोब्बर हेरलं
तसं अभ्यासात लक्ष नसायचंच आमचं कधीच
पण त्यादिवशी टिवल्याबावल्यांत पण रस नव्हता.
त्याला सांगितलं नाही
पण धडधड तशीच दिवसभर.
आपण काही चूक केलंय,
काही नको करू असं.
पण






पण
दुसऱ्या दिवसापासून आपोआप पाय कठड्या कडे
एखाद्या दारुड्यासारखे
ताई घरातून बाहेर पडली की लगेच.
स्वयंपाकघराला कडी लावू लागलो
पण पुन्हा काही दिसलं नाही...
पण तरीही
नुस्तं फ़टी तून पहाताना गोडशी धड धड व्हायची
हवी हवीशी वेदना
कळतच नसे...
कधी कोमल वहिनी घरात काम करताना दिसे
तशी मी तिला नेहमीच पाहायचो
पण फ़टीतून पहाण्याचा काही वेगळाच
सुखमय अनुभव
धडधड , भिती आणि सुख असं विचित्र मिश्रण.





साहित्य प्रकाशन

आणि एक दिवस लवकरच
मी असा फ़टीला डोळा लावून असताना
कडी लावायची राहिली
पायाच्या पोटरीवर फ़टका बसला तसा कळवळलो
ताईच्या हातात पळि होती
आणि डोळ्यांत अंगार
सपासप सपासप फ़टके मारत सुटली...



मला कळेचना
भिती
मार
मला तर रडायचीही चोरी. शेजारी येतील ना ...
कळवळत हुंदके देत होतो
आणि ताई तर बेभान

अखेर ताईच थकली
आणि रडायला लागली...

" अरे मी इतरांना राक्षस म्हणते रे,
सगळे माझ्या पाळतीवर
पण तू सुद्धा त्यांच्यातलाच निघावास ?"

ताई,

ताई
तुला मी वचन नाही दिलं काही
पण
पुन्हा कधीच असं काही केलं नाही गं.
तुझं दुसरं रडणं तरी कामी आलं.


- टल्ली



ई साहित्य प्रकाशन

ताईची शाळा सुटली तो दिवस

-----------------------------------------




मला अभ्यासाची आवड कधीच नव्हती
पण शाळेत तर जावंच लागे.
मजबुरीचं नांव महात्मा गांधी

ताईला अभ्यास आवडे
कायम पहिल्या पाचात नंबर
पण नववीतच शाळा सोडावी लागली.
या मजबुरीचं नांव कस्तुरबा गांधी.

बिचारी
आधी घरचं काम .
मग इतरांच्या घरी पोळ्या लाटायला.
ताईच्या हाताला चव आईच्या हाताची
काहिही केलं तरी चवदार व्हायचं
गांवातल्या प्रत्येक लग्नाकार्याला बोलावणं यायचंच.
खुप राबायची
हाताला चटके असायचे कायम
आणि कपड्यांचा बोंदरा

तरी ताई छान दिसायची
लग्नघरच्या नटव्यांहून देखणी, नाजुक
ती कधी तिकडे घासही घेत नसे
आणि बांधुनही आणत नसे
उरलं सुरलं तरी...नाहीच.
घरी येऊन पुन्हा स्टोव्ह पेटवायची
पपा तर स्वतःचा सगळा पगार टल्ली करायचे
आणि आता तिचेही पैसे उडवायचे
त्यांची तर चंगळच झालेली.





मला मात्र ताई दिवस दिवस भेटायची नाही
मी उठण्यापूर्वीच जायची
आणि रात्री मी झोपल्यावर परतायची
मला सारा थंड स्वयंपाकच मिळायचा
आणि ताई जगाला गरम पोळ्या वाढायची

मला राग येई
ताईचा
पपांचा
आणि सगळ्यात जास्त
आईचा
असं सोडून नसती गेली
तर हे सगळं घडलंच नसतं.
ना..!
हो ना ?

--------टल्ली



रमाकाकू... भाग १
---------------------

अचानक धनलाभ व्हावा
तशा रमाकाकू भेटल्या

ताई त्यांच्याकडे पोळ्यांना जायची
एकदा " येणार नाही" चा निरोप घेऊन मला जायला सांगितलं
बळेबळेच गेलो
ओरडा खायच्या तयारीने
पण उलट त्यांनी मला बसवलं
खाऊ दिला
टिव्ही लावून दिला
मला हवा तो चॅनल...


मग पुन्हा मी असंच काहीतरी कारण काढून गेलो
तर तसेच लाड
रमाकाकू खुप गोऱ्या नव्हत्या
ना खुप सुंदर
पण हसायच्या गोड
आणि प्रेमाने खाऊ द्यायच्या
हळु हळू रोजच शाळेतून परस्पर
कधी ताईला सांगून , कधी...

दाढीवाले दिलीप काका अंथरुणातच जास्त करुन.
कसल्याशा मोर्चात त्यांना
लाठीचा खुप मार लागला होता
चालताही येत नसे
दिवसभर खुप खुप जड जड पुस्तकं
आणि न्युज चॅनल

मी गेलो तर मात्र रिमोट माझ्याकडे येई

आठवीच्या सहामाहीत मी नापास झालो
आणि माझी चंगळच झाली
रमाकाकू माझा अभ्यास घ्यायला लागल्या
मला आता रोज जायला कारणच मिळालं.
त्या फुकट शिकवत
आणि समजावत खुप छान
मारतही नसत
आंजारुन गोंजारुन शिकवत
ताईलाही बरं वाटलं
'नानू अभ्यासाला लागला'


मला तर डबलमजा होती
गेल्या गेल्या खाऊ मिळे
मग थोडा वेळ टिव्ही
मग अभ्यास
रमाकाकू जवळ घेऊन शिकवत
माझा गृहपाठ पण करून देत
आणि मधून मधून चिमुकला खाऊ...
...आणि खुपशा पाप्या घेत.




कधी तरी उशीर झाला तर त्यांच्याकडेच जेवत असे
(रोजच व्हायचा तसा)
ते मात्र ताईला आवडत नसे
'भिकारी' म्हणायची
पण रमाकाकूंच्या गरम जेवणाचा मोह व्हायचा
तेही ताईच्याच तर हातचं ना...

एकदा शनिवारचा अर्धा दिवस शाळा होती
शाळा सुटली तसा रमाकाकूंकडे गेलो
मला ठाऊक होतं काकू जेवण वाढणार
पण वेगळंच झालं...


काका नव्हते
आणि रमाकाकूंचं डोकं दुखत होतं
म्हणून बेडरुममध्ये झोपलेल्या.
मी जाताच दरवाजाला कडी लावून घेतली
आणि पुन्हा झोपल्या...
मधे मधे कण्हत होत्या
मी अस्वस्थ
'आज जेवायला मिळणार की नाही ... ? '
विचारात आत गेलो
" रमाकाकू.. रमाकाकू ...
काय होतंय हो ?
बरं नाही का ? "





खुप वेळाने कण्हतच त्यांनी मला जवळ ओढलं.
त्यांचा श्वास जोरजोरात चालणारा
डोक्यावरुन हात फ़िरवला
"डोकं फ़ुटायला आलंय रे "
त्यांच्या अंगाला मात्र सेंटचा सुंदर वासच येत होता
बामचा नाही..
"बाम लावला का ?
आणुन देऊ ?"
" बाम आहे रे माझ्याकडे ..
जरा चेपून देशील डोकं ?"
त्यांनी आशेने पाहिलं.
हात माझ्या पाठिवर तसाच फ़िरत होता.

--टल्ली



साहित्य प्रकाशन


रमाकाकू भाग २

--------------------

त्या दिवशी बायालॉजीचा अभ्यास केला

--टल्ली

वाढतं वय
-----------




जानेवारीतल्या टेस्ट मध्ये
वर्गात सातवा नंबर आला
सत्तर टक्के मार्क आणि गणितात शहाऐंशी
सगळेच उडाले
ताईचा आनंद तर भुईनळ्यासारखा फुटत होता.
मला कुठे ठेवू काय करू असं झालं तिला
जणू मी इंजिनियरच झालो
रमाकाकूंच्या पाया पडली
माझ्या 'मुलाला' लाईनवर आणलंस -- म्हणाली

रमाकाकूंकडे शिकवणीसाठी पालकांची तर रीघच...
पण रमाकाकूंनी सुजयलाही नाही म्हटलं
मी मात्र दिवसभर पडीकच असे

खुप खाऊ
खुप अभ्यास
आणि खुप हसणं
आयुष्यात नंतर कधीच इतका हसलो नाही
कसल्याही कारणाने खिदळायचो आम्ही
गणित सोडवतानाही

माझि उंचीही वाढत होती
आणि बुद्धीही.

--टल्ली



झरा
------



मी मोठा होत होतो
आणि रमाकाकू लहान
आधी साड्यांत वावरणारी रमाकाकू
आता मॅक्सी, ड्रेस आणि एक दिवस
चक्क जीन्स घेऊन आली
जीन्स आणि गर्द हिरवा टॉप
भास होत होता की काय कोण जाणे
पण ती आता गोरीही दिसे
ताजी टवटवीत




हसताना तर माझ्याहूनही लहान होई
मिश्किल, धमाल, झऱ्यासारखी खळाळ
मला वाटायचं
हरवलेली कच्चूच आलीय
खूप हसली की लालसर व्हायची
आणि किंचित चकणी व्हायची
मला ते रूप खुप आवडायचं
अशावेळी मी तिला फ़क्त रमा म्हणे
रमा
आणि ती मला नान
फ़क्त नान
नान
रमा
नान... रमा.

---टल्ली



ई साहित्य प्रकाशन


भकास
----------



आठवीची वार्षिक संपली
सुट्टि लागली
आता तर मोकळं रान
पण रमाकडे जायचं निमित्त संपलं.

तरीही गेलोच
तर घर गच्च भरलेलं
रमाची सासू, दीर , जाऊ, पुतणे
रमाने घरात घेतलं.
खाऊ दिला
सगळे भोवताली
डोळ्यांत दयाभाव
आश्रिता सारखं वाटलं
थोडा वेळ अंग चोरून बसलो
चेहऱ्यावर बेफ़िकीरी
पण आतून खळबळ
पाणी पिऊन बाहेर पडलो

बाहेर रणरणतं ऊन
भकास रस्ता
आता जाणवलं
आता ताईही नव्हती कुठेच
आणि सुजयही नाही



मी आज अचानक एकटा झालो.

--टल्ली

ई साहित्य प्रकाशन

जावळी मंडळातल्या रात्री


-------------------------------




ताई घरात नसेच हल्ली
तिने आता घरकामं सोडली होती
फ़क्त कारखानिस वकील
आणि महाजन डॉक्टर
बाकी वेळ जावळी मंडळ मंगल कार्यालय
खुप राबायची
खुपच राबायची

तिकडे
पपांची कंपनी बंद पडलेली
गावातल्या सगळ्याच कंपन्या कारखाने बंद
हजारो कुटुंबं रस्त्यावर आलेली
त्यातलंच आमचं एक .

पण आमचं तर अक्षरशः रस्त्यावर आलं...
कारण आयुक्तांनी रस्ते रुंदीकरण सुरु केलेलं.
शहर सुंदर करत होते.
काम धाम नसलेलं सुंदर शहर.
रस्ते मोठे होणार होते
गलिच्छ वस्त्या तुटणार होत्या...
रस्त्यालगतची आमची चाळ चपेटमध्ये आली.
नवीन घर देऊ म्हणाले
पण तोवर ?
सहा महिने तरी आम्ही रस्त्यावरच ....






चार दिवस जावळी मंडळाच्या जिन्यातच सोय केली
पपा तर कुठे असत कोण जाणे
ताई आणि मी दिवसभर राबायचो
आणि रात्री जिन्यात
ताई भिंतीशी मुटकुळी करुन झोपे
आणि मी तिच्या भोवती
लाईट भगभगत रात्रभर
आणि माणसं येत जात..
कसलं ना कसलं निमित्त काढून.
मुद्दाम अंगावरुन जात
ताईला घासून


मला आता सगळं कळत असे
खवळायचो
अजून
अजून खवळतो आहे
अजून खवळतो आहे.

---टल्ली



# आठवीत पहिला आलो तो दिवस


------------------------------------



आठवी क मध्ये मी पहिला आलो
आणि सर्व तुकड्यांत सातवा

पण
याचा आनंद कुठेच नव्हता
घरी... घर नव्हतंच
तात्पुरतं झोपडं
लक्ष्मुंबाईने दिलेलं...
पपा नव्हतेच
ताई दिवस रात्र राब राब राबत होती
लग्नांचा मोसम होता
मरेस्तंवर काम...
आणि ताटावर पैसे...

सुजय नापास झालेला
तसं त्याला त्याचं काहीच सुतक नव्हतं.
तो मला नंबर मिळाल्याच्या आनंदात
आणि नोकरीच्या गुर्मीत
एका साउंड सर्विस वाल्याकडे,
आणि मंडप कंट्राक्टरचं काम पण होतं
तीन चाकी ट्यँपूत फ़िरायचा
जेवून खाऊन पगार
रात्री बेरात्री काम.
आणि टकार पोरांची संगत
खाण्याबरोबर पिणंही फ़्री.
सुजय प्यायला लागलेला




बी कॅबिनच्या पोरांत कायम लोळायचा
सिग्रेटी फुंकायचा
हम आपके हैं कौन चा ब्लॅक करताना पकडला गेला
पण सायबाने कानशिलात दिली आणि सोडला
लहान म्हणून



सुजय लहान दिसायचा;
होता त्यापेक्षाही लहान दिसायचा.
पण चुणचुणीत आणि चपळ
त्याची लाईनच बदललेली
आणि माझीपण
एकमेकांना समजणंही अवघड जात होतं
त्याने मला सरबत गोळा पाजला
तरी मी दुःखीच
तो नापास झाला म्हणुन
तर म्हण्ला " अबे रोन्या, रोना मत यार
तू इंजनेर होशील
तवा मी बिल्डर असेन यार
तुला नोकरी ’मीच’ देईन बघ
आपली शाळा अलगच आहे यार
अस्सल डिगरी भेटते."


मी हसलो
हसता हसता वाकलो
वाकूनच
मान खाली घालून चालू पडलो.

-टल्ली



शामली पाण्याशिवाय राहिली तो दिवस


-----------------------------------------------



ताई आणि सुजय
मी इंजिनियर होण्याची स्वप्नं बघत होते
पण मी माझी पहिली कमाई केली
जावळी मंगल कार्यालयात पाणी भरून,
लोकांना पाणी पाजून.

दिवसभर पोऱ्या म्हणुन राबलो
संध्याकाळी चाळीस रुपये हातात पडले
तेव्हा राजा झाल्यासारखं वाटलं
लक्षुंबाईने पैसे ताईच्या हातात दिले
'यातले कापून नाही घेणार ' म्हणाली
तेव्हा तिचेही डोळे भरले होते

मला कष्टांचं आणि अपमानाचं काही वाटत नसे.
एकदा वर्गातली शामली मराठे आली लग्नात नटून
तेव्हा थोडा बावचळलो
पण तिने ओळखच दाखवली नाही
बिचारी दिवसभर पाणी प्यालीच नाही.
काउंटरकडे फ़िरकली पण नाही.
तेव्हा मला हसू आलं.
मी तिला घाबरलो
आणि ती मला.
च्यायला...




-टल्ली

ई साहित्य प्रकाशन


माझ्या मनावर तेलाचा चटका बसला तो दिवस

---



ताईला हिडिस फ़िडिस करत तेव्हा मात्र मी खवळत असे
रक्ताने कान्शिलं लाल लाल तापत
कपाळाची शिर फ़ुटते की काय असं वाटे
ताईच्या पायाचं नख बघायची लायकी नसलेले
तिला घालुन पाडून बोलायचे
अंगावर पैसे होते ना....

एकदा तर कहरच झाला
संध्याकाळी बटाट्याची भाजी उरली
अंदाज चुकला पार्टीचा
इतर जेवण कुणी कुणी बांधून नेलं
पण बटाट्याला कोणी वाली नव्हता की काय...
लक्ष्मुंबाईने भाजी तशीच ठेवली
आणि दुसऱ्या दिवशी बटाटेवडे करायला दिले
थोडी आलं लसूण पेस्ट जास्त मारली
आणि मिर्पूड, हिरवी मिरची ...



साहित्य प्रकाशन

तरीही कसं कोण जाणे
मुलाच्या आत्याला चव कळाली
तिने चारचौघांदेखत वधुपित्याची खरडपट्टी काढली
अशी नासकी जेवणं घालता... मुलगीपण तशीच नासकी असेल...
असंच काही बाही...
आणि काय विचारता...
सगळे घसरले ताईवर...
लक्षुंबाईने काढता पाय घेतला,
कानावर हात ठेवले,
ती लोकांच्याहून जास्त कचाकचा करत सुटली

बिचारी ताई
मुकाट काम करत होती,
चारही बाजूंनी आग
आणि समोर तेलाची कढई
सपकन तेलाचा एक सपकार तिच्या अंगावर आला
पण हुं नाही की चुं
तशीच काम करत राहिली
रामभाऊंनी तिला पाण्यावर नेली
मीही धावलो
तेल पुसलं , पाणी मारलं, बर्फ़ लावला...


आजही तेलाचा तो वळ
माझ्या मनावर जळतो आहे,
आणि शब्दांचा तो व्रण अजून ओलाच आहे
माझी सारी कमाई तिथेच संपते.
आजवरची सारी कमाई...

-टल्ली

ई साहित्य प्रकाशन

नववीचा मे महिना

-----------------------




नखभर झोपडीएवढं घर होतं
त्यात तरी आम्ही असायचो कुठे ?
फ़क्त झोपायला जायचो
(म्हणूनच "झोप"डी ....)
झोप तरी किती ?
रात्री एक दोन वाजत यायला
आणि ताई चारलाच उठायची.
मला पाच सहाला उठवायची.
मग दिवसभर राबायचो
मी हॉलमध्ये पाणी किंवा असंच काही
ताई चुलीशी...

मे महिन्याचा जाळ
लोक पंखा किंवा कूलर धरून बसत
आणि ताई चुलीसमोर रटरटत्या आगीशी खेळे


पपा तर भेटतच नसत
फ़क्त पैशांसाठी येत
कधी कुणाचे उधार घेत
आणि देणेकऱ्याला ताई कडे पाठवीत

मला पपांचा राग राग येई
पण ताईला त्यांची दया येई
त्यांच्या एकटेपणाची
बेकारीची, अशक्तपणाची, कमकुवतपणाची
तिला सगळ्यांचीच दया



साहित्य प्रकाशन


ताई म्हणजे
दया क्षमा शांती यांची सुंदर मुर्तीच
कधीच कुणावर रागावत नसे
(एक मी सोडून...)
कोणाच्या मागेही अपशब्द नाहीच मुळी



मला आणि पपांना नवीन कपडे,
स्वतः लोकांनी दिलेल्या जुन्या साड्यांत वावरायची;
मात्र त्या जुनेरातही ताई
नवरीला मागे टाकायची
तिला नटण्याची गरजच नव्हती
दाट भुवया, टप्पोरे काळे डोळे,
आणि घामाने तकाकी आलेली कांती
अशीच उभी करावी, नवरी , करवली म्हणून...

चुली समोरच्या चटक्यांचे डाग
अंगावर उमटलेले
पण परिस्थितीचा ओरखडा
चेहऱ्यावर नव्हता
हसत खिदळत नसे कधी
पण दुर्मुखीही नाही
सदा चेहऱ्यावर हलकं स्मित
आणि डोळ्यांत
कर्तव्य आणि करुणा
गायीसारख्या डोळ्यांची माझी ताई
.....
माझी ताई
माझी ताई

--- टल्ली




ई साहित्य प्रकाशन

ताई भडकली तो दिवस
--------------------------

ताईचा नानू
इंजिनियर व्हायचा होता
बस्स
ताईला बसणारा प्रत्येक चटका
आणि चटके देणारा हरेक शब्द
यांच्यावरचं तेच एक मलम होतं
सारा भूतकाळ
सगळं वर्तमान
विझून थंड होई
माझी ताई
चंदनाचा लेप लावल्यासारखी
थंड असे ती एकाच ध्यासापायी
एकाच स्वप्नासाठी.

आणि म्हणूनच ती भडकली !


ई साहित्य प्रकाशन



त्या होरपळीतली सारी कमाई
तिने माझ्या शिक्षणासाठी लपवली होती
जेव्हा पपांनी तेच शोधायला सुरुवात केली
तेव्हा मात्र ताईचा भडका झाला
भडकूनही ताई
बोलली काहीच नाही
पण तिच्या डोळ्यांतली चूल
आणि उकळत्या तेला सारखा "नाही !"
पपाना जाणवला
ट्रंक तपासणारे पपा
मागे सरले
थरथरत बोलले
" रंडे सगळे पैसे त्या भावड्या वर उडवतेस
बापापेक्षा भावड्या जवळचा वाटतो
छिनाल
त्याच्या बायको पोरांचे शाप बसतील तुला
सांगून ठेवतो...
मग मला बोलू नकोस
सांगितलं नव्हतं म्हणून...
रांडे
मी घरी नसलो तरी
मला तुझे सगळे धंदे ठाऊक असतात..."



ई साहित्य प्रकाशन




ते विषारी शब्द ऐकून
मी तर भिंतीला खिळलेलो
ताईच्या एका इशाऱ्याने
मी प्रत्यक्ष बापालाही धुतला असता त्या दिवशी
पण मी खिळला गेलो


आणि ताई तर
जादूगाराने चित्त्याचा ससा करावा
तशी क्षणात मलूल झाली
चूल विझली
राखेतून पाणी वाहू लागलं

तेव्हा मला जाणवलं
एखाद्या मुलीच्या चारित्र्यावर
एक शिंतोडा किती घाव घालतो
एक शिंतोडा
सगळी आग विझवतो
सगळी चूल शांतवतो
सगळा खेळच बदलून जातो

----टल्ली



गढूळ...
-------




शिंतोड्याने आपलं काम चोख बजावलं...
इतरांचं सोडा
रामभाऊकडे बघताना
दुसऱ्या दिवशी मलाच कसंसं होऊ लागलं

रामभाऊ फ़ार उमदा माणुस
लोक नाना पाटेकर म्हणायचे
होता बिनधास्त
पण मनाचा मऊ
त्या दिवसापासून मात्र
त्याच्या मऊपणाचाही संशय येऊ लागला
त्याचं ताईला मदत करणं
मला सांभाळून घेणं
सारं सारंच संशयास्पद वाटू लागलं.

आता मी मोठा झाला होतो
ताईहूनही मोठा
आणि ताई मात्र लहान भासायला लागली होती
माझ्याहूनही लहान


मला जबाबदारी जाणवत होती
तसा मी ताईबद्दल संशय घेऊच शकत नव्हतो
पण ...






पण खरं सांगू?
रमाकाकूंना भेटल्यापासून
कुणाचीच खात्री वाटेनाशी झाली होती
नजर गढूळच झाली होती.
रमाकाकूंनी मला खूप काही दिलं होतं
खाऊ, माझ्या बुद्धीची चमक आणि प्रेम
पण काही तरी घेतलंही होतं हिरावून
ते आता जाणवत होतं.

---टल्ली




नपुंसक
--------




त्याच दिवशी माझं बालपण संपलं.

बालपण संपलं
पण मोठेपण मात्र सुरु होईना
ताईसमोर जायची हिंमत नव्हतीच
पण ईच्छा होई
समोर जाऊन छाती पुढे करुन सांगावं
" ताई , तू यापुढे घरी बस.
बस म्हणजे बस !
आराम कर !
मी आणतो कमावून
मी पोसतो तुला
मी लावून देतो तुझं लग्न
मी करतो सारं तुझं..."

पण यातलं काहीच जमण्यातलं नव्हतं.
मी असहाय दुर्बल लाचार
उद्याची स्वप्नं आज पोट भरू शकत नव्हती
उद्याचा इंजिनियर
आज लग्नात चाळीस रुपयावर पाणी वाटत होता
लाचार
दुबळा
खच्ची झालेला






दिवसभर खत्रुड लोकांचं "अरे तुरे"
"हाड हुड" ऐकून विझलो होतो
पुर्वी निदान नजरेने उत्तर द्यायचो
खुन्नस...
आता नजरही विझली होती
थंडगार.

पुरता पुरुष होण्याआधीच
मी कापुरुष झालो होतो
मी छक्का झालो होतो
मी हिजडा झालो होतो
मी नंपुंसक झालो होतो.
मी
मी उरलोच नव्हतो कुठे
माझी घृणा वाटत होती मला
१शी.

---टल्ली



नवी नववी


-------------



नववीचं वर्ष फ़ार विचित्र चाललं होतं.
वर वर शांत वाटणाऱ्या तळ्याखाली
एखादा ज्वालामुखी असावा
तसं झालं होतं
आमचं नवं घर एकदाचं तयार झालं
आम्ही वरच्या मजल्यावर होतो
आणि तसेही हवेतच वावरत होतो
पपा आता बार मधली प्यायचे
मीही माझ्या मे महिन्यातल्या कमाईच्या आधाराने
थोडा वरच होतो की
चाटे क्लास ला जायचो
आणि टेचात वावरायचो
मार्क आणि पैसे
उंचीही वाढली होती
आवाजही 'फ़ुटला' होता
थोडासा माजही येऊ लागला होता

ताईचेही कपडे वगैरे व्यवस्थित झाले होते
नीट वेणीफ़णी करुन जायची
[ते मात्र खटकायचं
हे सारं रामभाऊसाठी तर नव्हे ?]






इथेच

इथेच तो ज्वालामुखी होता
सगळ्या गावाच्या नजरेत
घराच्या नजरेत
खुद्द माझ्याही खाली घातलेल्या नजरेत
एकच कुतुहल होतं
या ज्वालामुखीचा स्फ़ोट होणार कसा

कुणाला भिती होती,
तर कुणाला आतुरता
कुणाला कुतुहल
तर कुणाला घाई
एवढाच एक फ़रक.
मला गंमत वाटायची याचीही

बाकी मात्र सगळं छान छान होतं
मी एक कविताही केली होती गोड गोडशी
आणि ताईने ,मला एक पार्कर पेन दिलं
बक्षिस म्हणून
कविता छापून आली एका गावकीच्या वर्तमानपत्रात
तर माझा कोण माज.
सुजय मात्र मला बायक्या म्हणे
नित्य नेमाने भेटे
आता तोच जावळी मंडळाचा साऊंड कंट्राक्टर झाला
आणि सगळ्याच हॉलवाल्यांना तो धमकावू लागला होता
एकेक नवा नवा धंदा काढत होता
दोन ऍब्युलन्स सुद्धा होत्या
(मारामारीला बऱ्या पडतात म्हणाला)



मला आता लोक "टल्लीचा मुलगा" म्हणूनच ओळखत
आणि एवढं मोठं नाव कोण घेणार
तेव्हा तसाच "टल्ली" झालो
म्हणजे आधी नावाने
आणि मग ....



पण नववीत ज्याम सज्जन होतो
मुली माझ्या वह्या नेत
काहीतरी कारण काढून बोलायला येत
बरं वाटे
कालपर्यंतचा ओवाळून टाकलेला मी
रमाकाकूंच्या जादूतून बाहेर आलेला
नवा टल्ली
नववीतला नवा नानू

---टल्ली

पपांना अपघात झाला तो दिवस
-------------------------------------

पण अपेक्षित स्फ़ोट झालाच नाही
भलतंच घडलं

एके दिवशी मी शाळेतून क्लासला जाताना वाटेत
रामभाऊचा धाकटा भाऊ आला बाईक वर
आणि म्हण्ला "तुझ्या बाबांना अपघात झालाय
चल"
मी सुन्न...
कळेचना काही.
पपांवर फ़ार प्रेम होतं असं नाही
पण...

तसाच गेलो
सिव्हील हॉस्पिटलात
तर रामभाऊ पोलिसांना पटवून पपाना वॉर्डात पोचवून बाहेर आलेला
माझ्या हातात चिठी आणि पैसे दिले
आणि मी औषध आणायला पळालो
(म्हणजे पपा जिवंत आहेत... )
धावत वर आलो वॉर्डात
तर वाटेत सगळी मरणकळा
पपा ओळखू देखिल येईनात
नशेत असताना रिक्षाने उडवल्याचं कळलं.
काय बोलणार ?
रामभाऊच्या लोकांनी रिक्षावाल्याला चोपला
आणि पोलिसात दिला
वर खर्चापाणी पण घेतलं

थोडं इकडे
थोडं तिकडे नेलं.
पपांच्या मांडीची नळी फुटली होती
असं Xray वाला बोलला
बाकी जखमा किरकोळ होत्या
पण " आयुष्यात चालतील असं वाटत नाही" म्हणला
(....बरंच झालं)

मात्र रामभाऊ गप्प बसेना
चौथ्या दिवशी
ताईला घेऊन मोठ्या डॉक्टरला भेटला
प्रायव्हेट इलाज करावा का असं विचारायला.
तेव्हा डॉक्टर बोलले
KEM ला हलव
माझा मित्र आहे तिथे
मी सांगतो त्याला
(आकडा पण त्यांनीच सांगितला असावा)
आणि पपा सुजयच्या ऍब्युलन्समध्ये झोपून
KEM च्या ओर्थोपेडिक वॉर्डात पोहचले


--टल्ली

वॉर्ड नं २०३
----------------

इथलं काम भारीच असतंय
इथे भेटतात पेशंट वर्ष वर्ष पडून राहिलेले
ज्यांना बघायला कुणी महिना महिना येतच नाही


माणुसकीचा गंध संपला म्हणावा
तर
यांचं काम चालतं माणुसकीवर
शेजारच्या बॆडवरच्या पेशंटचे नातेवाईक
सगळं करतात यांचं
स्वतःच्या पैशानं
कुणि "गेला" की शेजारचे रडतात
आणि बरा होऊन चालला
तरीही यांचे आवाज भारावतात.


पण एकाच्या खोकण्याने दुसरा संतापतो
आणि घरचे भेटायला आले
तर सगळं शेजारच्या बद्दलच बोलत रहातो
सुरुवातीचे दिवस आम्ही
दिवसभर असायचो
मी शाळा सोडून
ताई काम सोडून
पण लवकरच कळालं
आपलं काही कामच नाही
ऑपरेशनची तारीख कळेल
तोवर पपाना नुसतं पडून रहायचं होतं



शेजारच्या बेडवर
एक आमच्या पैकीच भेटले
पपांची दोस्तीही झाली
त्यांना सर्व "भाई" म्हणत
आणि पपाना "पपा"
इथे तरी आम्हाला कोणी टल्ली म्हणत नव्हतं
अजून एक माणुस आला
बळीराम
तोही भाईंच्या वसईचाच निघाला
त्याचा फ़क्त हात मोडला होता
बाईकवरुन पडून
त्यामुळे सगळी फ़िरस्ती कामं तोच करायचा
या दोघांचीही.

मग तर आमची काळजीच मिटली ...
....
तसं खरं सांगायचं तर पपांसाठी
आतडं तुटत होतं अशातला भाग नव्हताच
लोकलज्जेस्तव जेवढं करायचं
तेवढंही करायची शक्ती नव्हती
ताईच्या कामावर पोट होतं
आणि माझे दहावीचे क्लास सुरु होत होते
नववीची परिक्षा जवळ आलेली
कधी गेलो तर पपा
उन्हाळ्याची तक्रार करायचे
कायम पाठीवर झोपून झोपून
घामाने फ़ोड आलेले
आणि प्लास्टरमधली मांड खुप खाजायची
अंगाला कंड सुटलेला
आंघोळ नाहीच
घाण यायची जवळ गेलं की






दया यायची, नाही असं नाही...
पण त्याला जबाबदार तर तेच होते ना ?
आता कोण काय करणार होतं ?

ताई मात्र आता पूर्ण रामभाऊच्या दयेवरच अवलंबून होती
तसे आम्ही सगळेच
तोच सगळी धावपळ
ओळखी, पैसे, वेळ
आम्ही त्याच्याशिवाय काहीच करु शकलो नसतो

पपा तरीही त्याच्याकडे रागानेच बघत
आणि मी कसा बघत असे ते मला ठाऊक नाही
पण बहुधा माझ्या नजरेत संशय येत असावा
...
डोळे कधी खोटं नाही बोलत यार.


----------टल्ली



ई साहित्य प्रकाशन

बळीराम


----------



पपांचं ऑपरेशन
माझी परिक्षा
आणि लग्नाचा मोसम
एकदमच आले
रामभाऊलाही वेळ मिळेना
ताईही अडकलेली
आणि माझे क्लास

पण देव अल्टरनेट देतोच ना
बळिरामाची आणि त्याच्या लग्न झालेल्या मोठ्या भावाची
खुप मदत झाली.
मोठ्या भावाचे सासरे म्युनिसीपालटीत मोठ्या हुद्द्यावर
त्याचा फ़ायदा झाला
पपाना बरं वाटलं
पायाला
आणि मनाला
त्यांनाही "भावड्या" डाचत होताच
पण ताईला मात्र खुप वाईट वाटलं
आपण करायला हवं तेवढं करु शकलो नाही याचं

मला मात्र नाही वाटलं काहीच
उलट आता पपा घरी येणार याचंच वैषम्य वाटे
कारण आता या वर्षी मी
खुप अभ्यास करायचं ठरवलं होतं.



एके दिवशी सुजय आला
किती पैसे पाहिजेत म्हणाला
तसं रमाकाकुंनीही विचारलं
आणि आत्यानेही
पण ते वरवरचं
सुजय मात्र मनापासून बोलला

अशी देवमाणसं भेटतच होती त्या काळात
बळीराम पपांच्या आधीच घरी गेला
पण तरीही रोज येई भेटायला
प्लॅस्टरमधला हात घेऊन
आमच्या पेक्षा जास्त फ़ेऱ्या मारी
नारळ पाणी देई आणून...

एक दिवस मी रिकामं शहाळं फ़ेकायला गेलो
तर भपकारा आला
... तेच्यायला
माझा बाप भलताच बेरकी निघाला

पण बळिराम आणि पपा दोस्त झाले खरे
वयाचं अंतर न ठेवता.

असा उन्हाळा संपला
आणि अर्धा पाऊसही संपला
माझा १० वीचा बराचसा पोर्शनही
संपला.

------टल्ली

ई साहित्य प्रतिष्ठान

# ताईचं लग्न

--------------



गणपतीच्या दिवसांतच
पपा घरी आले
आता नवीनच अडचण
आणि अभ्यासाला खोळंबा

पण आता पपा बदलले होते
अंगावर येत नसत
कावत नसत
कधी मधी एखादा गोड शब्द बोलत

बळीराम इथेही येई
आणि रामभाऊ पण
पपाना रामभाऊचं येणं खपत नसे
आडून आडून बोलत

... आणि एक दिवस म्हणाले
'तुझ्या ताईचं लगीन ठरवलंय
बळीरामाशी
चांगला पैसेवाला नवरा
गाडी, घर, बिल्डिंगी आहेत
नशीब काढलं पोरीने
बघ माझा पाय गेला
पण त्याच्या बदल्यात असा जावई भेटला'



ई साहित्य प्रकाशन

ताईला आवडलं नसावं
मलाही का कोण जाणे पसंत नाही पडलं
तो बिजवर आहे हे ठाऊकच नव्हतं तेव्हा
आधीच्या बायकोने जीव दिला हे तर नव्हतंच ठाऊक
पण तरीही का कोण जाणे
आनंद असा नाही झाला



पण पपांचा उड्या मारणारा आनंद
आणि नाव ठेवायला काहीच जागा नाही
काय बोलणार ?


ताईचं लगीन ठरलं
...ताई जाणार आता

खळबळ झाली
कासावीस व्हायला लागलो
आता जाणवलं
आपल्याला दुसरं कुणीच नाही या जगात
जणू घासच गिळता येईना

कितीतरी वेळ नुसता पाणीच पीत होतो...
डोळे कोरडे
पण बांध फ़ुटायचा अवकाश होता
ताई
ताई घरात कामच करत होती
मान खाली घालून.

ताईने नंतर कधीच मान वर केली नाही
माळ घालतानाही.


---टल्ली



ई साहित्य प्रकाशन

ताईच्या घरी पहिल्यांदा गेलो तो दिवस

-------------------------------------------



ताईचं लग्न तसं साधंच
गांवाला जेवण देणारी ताई
स्वतःच्या लग्नात जेवलीच नाही
सगळंच घरगुती झालं

मुलाकडची चारच माणसं
बायका सोन्यानं लादलेल्या
आणि मित्रही
पांढरे कपडे, पांढरे बूट आणि सोनेरी चैनी, आंगठ्या


ते बघून ताईच्या घरी जायची भितीच वाटायची

पण निघालोच एकदा
रिकाम्याच हाताने
सुदाम्यासारखा

अकरावीत होतो
पण दिसायचो बारक्या
अशक्त, कुपोषित...

ट्रेन मध्ये सिल्पर तुटली
आणि अर्धा खचलो
तशीच सुत्तळ बांधून गेलो





वसईच्या समुद्राजवळ
गल्ल्यागल्ल्यांचं गाव
आणि दोन घरांच्या मधली जागा
ओले गटार रस्ते...
सगळं सारखंच दिसे
विटांना बाहेरून प्लास्टर असलेलं
येकच घर
बळीरामाचं

ओट्यावरच सासऱ्यांच्या समोर
बळीरामाचे दोस्त फुंकत बसलेले
मला न बघितल्यासारखं केलं
आणि मी पण...
तडक आत


तर ताईच्या सासूची वचावच ऐकू आली
आणि ताई तर दिसेनाच कुठे
मग
काळोख्या कोपऱ्याच्या धुरा आड
ताईची कृश आकृती दिसली

तिला बघून
मी  थांबलो

मला बघून
सासू थांबली
पण ताई मात्र हलली नाही
थिजल्यासारखी
भिजल्या कोंबडीसारखी
बघत राहिली



ई साहित्य प्रकाशन



मी
पार्ले जी चा पुडा
ताईच्या सासू समोर ठेवला

धूर वाढतच चाल्लेला
चुरचुरणारे डोळे
आणि सन्नाटा दाट होणारा


सासूच ओरडली
’थोडं राकील घाल XXX लाकडावर ”

तेव्हा ताई मला पाणी देत होती
ग्लास माझ्या हातात न देताच चुलीकडे वळली

पाणी देणारा लाकडासारखा हात
चर्र झालं
आणि कोरडे डोळे


ताई
ताई
ताई

---टल्ली




ई साहित्य प्रकाशन


माझी बारावी
---------------



अकरावीच्या वर्षातच बारावीचा अभ्यास लागला
मी तर वेड्यासारखा अभ्यासाला लागलो.
कधी कंटाळून पुस्तक बाजूला सारलंच
तर ताईचा गालफ़ुगडं वर आलेला
मोठ्ठ्या डोळ्यांचा चेहरा दिसे
तिच्या आशा
तिची स्वप्नं
सगळी फ़क्त माझ्यावर होती
वेडी ताई
तिचा झपाटलेला भाऊ

इतर मुलांना अभ्यासाचं ओझं असे
मला तीच एक रंगीन दुनिया
फ़िजिक्स मॅथ्स चे प्रॉब्लेम
माझी  रोजच्या प्रॉब्लेम मधून सुटका करत
तोच तर विरंगुळा होता
पुस्तकांबाहेर
एक भयानक जग
विकृत वास्तव
मला गिळू पहात होतं






दमून झोप लागेपर्यंत अभ्यास अभ्यास
रात्री दचकून जागा व्हायचो
ताईची काळजी वाटायची
मग अंथरुणात पडण्यापेक्षा
डेरिव्हेटिव्हज सोडवायचो
केमिस्ट्रीच्या रिऍक्शन्स पाठ करायचो

पुस्तक खाली ठेवताना
पपांचा तिरस्काराने भरलेला थोबडा दिसे
मग अभ्यासाला अजूनच चेव येई


बारावीची सीईटी माझं युद्धस्थळ होतं
अभ्यास माझं विश्रांतीस्थान होतं
एखाद्या वर्षभर ताणलेल्या धनुष्यासारखा
मी अधीर झालो होतो
सुसाट सुटायला
माझ्या ताईला सोडवायला
माझ्या ताईची स्वप्नं पूर्ण करायला
एकच ध्यास होता
इंजिनियर व्हायचं
ताईसाठी

--टल्ली



ई साहित्य प्रकाशन

माझी बारावी ---२
-------------------------





रामभाऊ अधून मधून पैसे द्यायचा
म्हणायचा ताईचे आहेत.
माझ्या मनात येई
ताईचे पैसे, तर सगळेच का नाही देत ?
ताईने याच्याकडे का दिले ?
हा स्वतःचे तर नाही देत ?

पण
माझ्या संशयाचा
त्याला संशयही येऊ देत नसे
दुसरा कोणी नव्हताच आता
काहीच मार्ग नव्हता
तोच देव होता

आणि ताई देवी

ताईचं एकदाच पत्र आलं
घाईघाईत चोरून लिहील्यासारखं दिसलं
तिनंही लिहीलं
नानू...
रामभाऊकडून पैसे घेत जा
माझेच आहेत
तुझेच समज
माझं सर्वस्व तुझ्यात आहे
माझं जग, माझा नानू
तू लांब असूनही जवळ आहेस
तू एकच तर आहेस जवळ.






कधी अंतर नको देऊ भाऊराया
कितीही लांब गेले तरी.

शेवटची ओळ
पाण्यावर तरंगत राहिली
उचंबळत राहिली
भळभळत्या जखमेसारखी
पत्राच्या कितीही घड्या घातल्या
तरी दिसत राहिली
टोचत राहिली
अस्वस्थ अस्वस्थ करत राहिली

ताई
ताई
ताई


--टल्ली



ई साहित्य प्रकाशन

## शाळा संपली तो दिवस


-------------------------



सीईटी चा शेवटचा पेपर संपवून घरी आलो
दोरी तुटलेल्या धनुष्यासारखा
हल्लक हलका
कधी एकदा ताईला भेटेन असं झालेलं
पण मनात अनामिक धाकधूक
काहीतरी भीषण घडणार...


घरी
पपा रोजच्या कोपऱ्यावर नव्हते
आणि शेजारच्या शांताकाकू
पायरीशी माझी वाट बघत होत्या
तेव्हाच शंकेने बेजार झालो.

मी घरात जाताच
शांताकाकू
अन अजून दोघे तिघे
बरोबर आले
त्यांचे भेसूर चेहरे
अपवार्ता ...
भिती...
काळोख....
सुन्न सुन्न...
शब्दांआधीच वीज चमकावी तसा
अख्खं शरीरभर लुळा पांगळा झालो



ई साहित्य प्रकाशन

रामभाऊ
नंतर आला
तोवर सारे गप्पच...
न बोलता मला सगळं कळत होतं
पण ऐकायचं नव्हतं



रामभाऊ
त्याचे डोळे लाल
अन चेहरा सुजलेला
कुणि मारलं असावं असा...
विचित्र भकत होता

“ ती कशाला जीव देईल ?
तिला याच चांडाळांनी ढकललं समुद्रात
साले हरामी
आणि तुझा बेरड बाप साला
बापाच्या नावाला कलंक भँचोद
स्वतःच्या मुलीचा सौदा केलान् साल्याने”

परत परत तेच बोलत होता
कधी मला जवळ घेऊन
कधी दूर लोटून

बाकीचे सगळे पुतळ्यासारखे स्तब्ध



जाता जाता बोलला
“तुझ्या परिक्षे साठी थांबली रे ती
तुझ्या परिक्षेसाठी...
किती किती सहन केलंन बायोने
तुझ्यासाठी फ़क्त रे... तुझ्यासाठी.
.... आणि माझ्यामुळे...
........
...खरंच सांगतो रे नानू
लोक बोलतात ते सगळं खोटं आहे
सगळं खोटं आहे !
....
तुझी ताई
देवी होती रे... साध्वी होती !
पवित्र
कोऱ्या वस्त्रासारखी
कसलाच डाग नव्हता रे
कसलाच डाग नव्हता !
कसलाच डाग नव्हता !”

मी
त्याही दिवशी रडलो नाही.

---टल्ली

निरोप
-------

ताईचं अंत्यदर्शन काही मला झालं नाही
दोन वर्षांत एकदाच भेटलो तिला
आणि एक पत्र


तरीही ती कायम माझ्या जवळ
माझ्या पाठीचा कणाच जणू
मीही कायम
तिच्या दुपट्ट्याला बांधलेला
न भेटताही
आम्ही इतके जवळ
आमच्या मधून मुंगीही जाऊ शकली नसती

पण
ती किती दूर गेली होती
ते त्या दिवशी कळलं

तिने माझी सगळी व्यवस्था केली होती
रामभाऊला तिच्या प्रत्येक शब्दाचा अर्थ
आता लागत होता
तिने या दिवसाची तयारी
एक वर्षापासून केली होती
आणि माझी परीक्षा सुरळीत व्हावी
एवढं एकच बंधन होतं








मला आता तिची इच्छा
पुर्ण न करणं
म्हणजे पाप ठरलं असतं पाप.
केवळ तिच्या त्या इच्छेसाठी
मी उरलो होतो

तशीही
दुसरी कसलीच शक्ती नव्हती
सुजयसारखा असतो
तर एक दोन कोथळे काढले असते
पण...

मी आता संपलो होतो
नानू आता संपला होता.


---टल्ली



ई साहित्य प्रकाशन

समुद्रकविता १

-----------------------------------------------




खळबळता समुद्र बघतो तेव्हा  तेव्हा
भुरभुरती वाळू बघतो तेव्हा  तेव्हा
मी तुला विसरतो , ताई
मी तुला विसरतो.

कलत्या सुर्याच्या लालस बिंबासाठी
हा समुद्र जेव्हा निळा जांभळा होतो
झुळझूळता वारा अंगावरती माझ्या
उधळतो
पसरतो
माया बनून येतो
उबदार बिंब सरकते हळुच क्षितिजाशी
मी संधीप्रकाशासाठीही तळमळतो
थांबवू पहातो
थांबवू पहातो हा सरणारा काळ
थांबवू पहातो येऊ घातली रात्र
पण थांबत नाही
पण थांबत नाही वारा
छातीवर माझ्या लोट वाळूचे येती

लाटांना मागे जाताना मी बघतो
भुरभुरती वाळू डोळयांमध्ये जाते
मी तुला विसरतो ताई
मी तुला विसरतो.

-टल्ली



ई साहित्य प्रकाशन


दुसरी समुद्रकविता
--------------------

खारे अश्रू पिता अगस्ती
तर त्यालाही कळले असते
समुद्र गिळणे सोपे होते
पण ते अश्रू पचले नसते

उचंबळून तोही येतो रे
उठती लाटा
वाळुवर फ़िसकारत येती
फ़ुत्कारत येती सापाच्या फ़ण्यासारख्या वेड्या लाटा
पण त्यांना मर्यादा आहे
समुद्र दिसला किती खोल तरी
त्यालाही एक तळ आहे ना


तिच्या अश्रूंना
लाटा नाहीत
मागे ढकलून देईल असला
किनाराही नाही त्या पाण्या
आणि वेड्या तिच्या मनाला
तळ नसला
तरी तळमळ आहे
खोली त्याची
तुला समुद्रा
कधीच कधीच गाठायाला जमले नसते
उचंबळुन तो समुद्र येतो
तेव्हा मीही वाहून जातो
आणि उरते एक कलेवर
फ़ुगलेले दुर्गंधी घेऊन

ई साहित्य प्रकाशन




मी ठरतो, फ़िरतो, त्या मार्गे
वाळूच्या किल्ल्यांना तुडवत
रस्ता माझा पुन्हा शोधतो
रस्ता माझा
जुना शोधतो.

---टल्ली




तिसरी समुद्रकविता
----------------------



भिकारी तु ?
देवांनाही रत्नं देणारा तू-
माझं रत्न गिळताना लाज कशी नाही वाटली ?
गिळलंस;
आणि मला दिलंस हलाहल,
तेव्हा त्यांना झाला आनंद अमृत मिळाल्याचा

मी तर हलाहल पचवलं
तू माझ्या रत्नाला नाही पचवू शकलास
शेवटी तिसऱ्या दिवशी तिचा देह दिलास परत
आणि आत्मा ?
तो तू पचवूच शकत नाहीस साल्या...
तिचा आत्मा घेशील तर
आग लागेल तुझ्या सर्वांगाला
पेटशील तू उभा
पेट्रोलसारखा
राखही नाही रहाणार बाकी.

माझ्याशी इथवर पंगा घेतलास
आणि हरवलंस प्रत्येक डावात मला
मानतो मी.
पण आता मीही शिकलोय खेळ
त्यांना तर अमृत ओकायला लावीनच
आणि मी...
तुला ओहोटी लागते ना
तशी मलाही लागली असं समजेन
आणि भरतीची वाट बघेन



ई साहित्य प्रकाशन

आज
नाही तर उद्या
नाही तर परवा नक्की...
माझीही भरतीची वेळ येईल...
माझीही वेळ येईलच भरतीची ...,

तेव्हा बघून घेईन
सगळा हिशोब...
पै न पैचा हिशोब
बघूनच घेईन.


-टल्ली



ई साहित्य प्रकाशन

चौथी समुद्रकविता


----------------------




नक्कीच मध्यरात्र उलटली असावी.
किनारा साम सूम
मी थंड वाळूवर उताणा पडलेला
अस्ताव्यस्त.. प्रेतासारखा... न फुगता.
भिजलेला
भिजलेले खाऱ्या पाण्याने कपडे
भिजलेली आतडी कच्च्या वोडकाने
भिजलेलं मन तुझ्या आठवणीने
भिजलेलं शरीर...
फ़क्त पापण्या तेवढ्या कोरड्या .

शुद्धीवर आलो तर
पोटात आग
अस्ताव्यस्त हात आणि पाय
शर्टाची बटणं तुटलेली
आणि तुटके तारे लोंबतात वर आकाशात
खंजीराच्या पात्यासारखी चंद्र कोर
अघोरी...अघोचर
लटकते आहे मानेवर
दोर तुटण्याची खोटी.. खस्सदिशी गळ्यात रुतायला आतुर

या लाटा उफ़ाळून येतात.. येतात.. येतात... आणि
जातात आपसूक मागे
जसे शिवशिवणारे हात पडावेत लुळे...






या लाटा उफ़ाळून येतात.. येतात.. येतात... आणि
जातात आपसूक मागे
जसे शिवशिवणारे हात पडावेत लुळे...
वारा वाहातो तशी गलबतं चालतात
रात्री ना वाऱ्याला उसंत ...
ना गलबताला
ना गलबलत्या मनाला
....लाटांसारखं उचंबळत रहातं..पुढे येतं..येतं...येतं
आणि वोड्काच्या घोटासरशी परततं मागे... दबक्या पावलांनी.

समुद्रा...
तू आणि मी
सारखेच रे षंढ.. नंपुसक.
काहीच नाही व्हायचं आपल्याकडून
कधीच काही नाही व्हायचं....
आपण फ़क्त दिसण्यापुरतेच खवळलेले रे....

पण नाही.
तुलाही येते कधी कधी सुनामीची हुक्की
मला तर तेही नाही रे जमत.
ना निर्मिती
ना ध्वंस.



जाऊंदे

चल... बूट कुठे पडलेत ते शोधून काढू.

-टल्ली

पाचवी समुद्रकविता
-----------------------

जगाच्या तिरस्काराचा येतो वीट तेव्हा
मी या खडकावर येतो
समुद्रात मैलभर आत
एकोटा हा कभिन्न खडक
आणि त्यावर हात फ़ैलावून मी उभा
एकजीव होऊन जातो आम्ही

हजार जीभांनी हा समुद्र
आमच्यावर थुंकत असतो
प्रत्येक लाट त्याची उडवते
फ़ेसाळ चिकट थुंकी
आमच्या अंगातोंडावर



आम्ही दोघेही अचल
न डगमगता
थुंकी झेलत रहातो
एक एक शिंतोडा थुंकीचा
एखाद्या मेडलसारखा मिरवत रहातो


आणि तो समुद्र
न दमता
न थकता
थुंकी ओकत रहातो
हजार लाटजिभांनी
इस्स इस्स इस्स करत


ई साहित्य प्रकाशन



संध्याकाळ कलते
एक खेकडा नांगी मारुन मला जागं करतो
माझ्या तंद्रीतून.
मी हात मिटतो
गुढघे दुमडतो
पाठीत पोक काढून
खडकावर बसतो....उकिडवा
मान गुढघ्यांत खुपसून
बोलतो... हमसाहमशी
माझ्या कातळाशी

समुद्राला अधिकच चेव येतो
...
समुद्राला अधिकच चेव येतो
तो थुंकत रहातो पचापच
पण माझ्या डोळ्यांतल्या दोन खाऱ्या थेंबानी
होतो आम्ही शुद्ध.
मी
कातळाला मिठी मारतो
कातळ
मला लिपटतो
समदुःखाच्या भाषेत
माझ्याशी बोलतो






....

शेवटचे सुर्यकिरण
विरतात
मी सोडवतो स्वतःला मिठीतून
आणि भरतीची वाट कापत
फ़िरतो माघारी
भरल्या....मनाने.
भारल्या .... मनाने.

----टल्ली




समुद्रकविता सहावी
-------------------------



ही सुरूची झाडं किती विचित्र दिसतात
काड्यांसारखी पानं
सुक्कट खडबडीत फ़ळं
आणि जमिनीवरच फ़ाट्या फ़ाट्यांची मुळं
वाटतं हे झाड सगळ्या दुनियेला या फ़ाट्यांवर बसवतंय
वादळ वाऱ्यानेही न वाकणारं हे झाड
फ़क्त उभं असतं समुद्राकडे पहात
असं जमलं पाहिजे यार
जगता आलं पाहिजे...

हल्ली साला सोड्यालाही फ़ेसच येत नाही
बाह्या वर सरसावायला
चेवच येत नाही
फुर्फुरणाऱ्या घोड्यासारखं
आयुष्य धुमसतं उगाचच
उगारलेल्या हाताला मात्र
वेगच येत नाही
....
अशा वेळी वाटतं
बनावं सुरुचं झाड
नुसतं वाढत जाणारं
ना कुणाशी देणं ना घेणं
....
फ़क्त वाळूत पसरून फ़ाटे ... असावं.
फ़क्त... असावं.

---टल्ली



ई साहित्य प्रकाशन


'अखेर' ची समुद्रकविता०००

------------------------------


00000


बस्स... खुप झालं...
चिक्कार झालं हे काठा किनाऱ्याने जगणं.
ना धड उपजाऊ जमीन
ना धड जिवंत पाणी
ही भकास वाळू आता नकोशी झालीय
बस्स... खुप झालं.

नकोसं झालंय हे हिजड्यासारखं जगणं
वांझ
निर्बीज
केवळ कुणावर तरी सूड उगवत असल्यासारखं
जगत रहायचं
कूणी पाहील याची आस नाही
आणि कुणी पाहिलं तर लाज नाही
ना काही क्राईम
ना काही सत्कार्य
नुसतं वाळूसारखं भुसभुस सरकणं
बस्स... अती झालं आता
अतीच झालंय.




समुद्राचं एक बरंय
त्यात उडी नाही मारावी लागत
खरचटत नाही
हात पाय तुटणार नाहीत
वेदना नाही
ना फ़ेल होण्याची भिती .
०००अगदी सहज
टहल टहल टहल करत चालत रहायचं
क्षितिजाच्या दिशेनं
बुडत्या बिंबाला कवेत घ्यायला
थोडी टाकलेली असली की
भितीही नाही वाटत.
उलट मजाच येईल
लाटांशी वाद घालत चालायला.
शेवटचा क्षण उफ़ाळत्या उत्साहात साजरा करायला.
समारंभ ००० समाखेर.






मागे वळून बघायला काहीच नाही उरलेलं
काहीच
कुणीच
कुठेच काही नाही
कधी नव्हतंच.

एक निर्जीव वठलेला वृक्ष
ना फ़ळ
ना पान
ना कोंब
फ़क्त वखवख करणारी मुळं
ती आता उपटावीत अणि
बुडवावीत खाऱ्या पाण्याच्या या उफ़ाळत्या कल्लोळात.
लोकांना काय करायचंय ?
असं हे भंकस अस्तित्त्व,
वळचणीच्या किड्यासारखं,
बुळबुळीत
गेल्याचं कुणाच्या ध्यानातही नाही यायचं
कुणि हळहळणार नाही
ना कुणी खुश .
समुद्रातला एक टिंब वाळून गेला तर
त्याचं कुणाला काय ?



ई साहित्य प्रकाशन



चल बाळा
ठेव पेन डायरी खाली
बुटांपाशी.
उगाच काही लिहून ठेवू नकोस
ज्याला डायरी सापडेल त्याला थोडी तरी कोरी पानं मिळू देत
वापरायला.
बाटलीतला शेवटचा घोट घे.
नेणाऱ्याला रिकामी बाटली मिळू दे.
टी शर्ट पण काढून ठेव.




बाकी काहीच ठेवू नकोस मागे
इच्छा, बंध, धागे, दोरे.


चल
नीघ

चाल
चाल
टहल
टहल
टहल
०००
टळ
०००

---- टल्ली०




ई साहित्य प्रकाशन



आकाशात स्वच्छंदी उडू पाहणारा पतंग कधी कटतो
तुटतो
आणि वास्तवाच्या तारांमध्ये अडकून पडतो
म्हणजे सारे काही संपते असे  नाही
टल्ली ... टल्लीचं आयुष्य ... टल्लीचा प्रवास
आणि टल्लीची शाळा
पुढे चालूच राहणार  हे ओघानेच आले

पुढे काय झाले याची उत्कंठा असल्यास
संपर्क साधा

esahity@gmail.com



ई साहित्य प्रकाशन